स्वतःला ओळखा आणि आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २७ मे २०२५ | अंक १६४ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007

All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY

www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555




# वैष्णवी हगवणे प्रकरण, न्याय मिळाला नाही तर?

## जरांगे पाटलांचा थेट सरकारला इशारा,

पुण्यामध्ये एक धक्कादायक घटना घडली होती, वैष्णवी हगवणे या विवाहीत महिलेनं गळफास घेऊन आपलं आयुष्य संपवलं, सासरच्या छळाला कंटाळून वैष्णवीने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे, या प्रकरणात पोलिसांनी वैष्णवीचा पती, तिचा दीर, सासू, सासरा आणि नदंण यांना अटक केली आहे, या प्रकरणानं राज्यभरात खळबळ उडाली आहे. दरम्यान आज मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कस्पटे कुटुंबाची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी मोठी मागणी केली आहे सत्तेमधील आरोपी आहेत म्हणून हे प्रकरण दाबलं असं वैष्णवीच्या कुटुंबाला वाटलं नाही पाहिजे, फाशी देऊन न्याय झाला पाहिजे, गृह विभाग कमी पडत आहे का? हे या प्रकरणावरून लक्षात येईल, जर न्याय झाला नाही तर पुन्हा उठाव होईल. महिला आयोग यासाठीच आहे, जर महिलांवर अन्याय होणार असेल तर कारवाई झाली पाहिजे. महिला आयोगावर राजकीय व्यक्ती बसते, ती प्रत्येकाची प्रथा आहे, ज्याची सत्ता येते तो आयोगावर आपला व्यक्ती बसवतो. पण कुणीही या आयोगावर असेल त्यांनी काम चांगलं केलं पाहिजे जेणेकरून नाव निघेल आणि महिलांना न्याय मिळेल, राज्यात पावसामुळे झालेल्या नुकसानाबाबत उद्या बोलले आज वैष्णवीसाठी न्याय मागायला आम्ही आलो आहोत. नेमका काय तपास सुरू आहे, याबाबतची माहिती कुटुंबाला कळवली जात नाही, तपाससंदर्भातील सर्व माहिती कुटुंबाला मिळाली पाहिजे, असंही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# बीडमधील स्वच्छता मोहिमेला गती बीडमधील स्वच्छता मोहिमेत डॉ.योगेश क्षीरसागर फिल्डवर डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने घेतली होती मुख्याधिकाऱ्यांची भेट.



### सतत देखरेख, आढावा घेतला जाणार

स्वच्छता मोहिमेचा नियमित आढावा घेण्यात येणार असून प्रत्येक वॉर्डातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेला अधिक प्रभावी करण्यासाठी नागरिकांच्या सूचना व सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे.

### बीड शहरवासीयांचे सहकार्य महत्त्वाचे-डॉ.योगेश क्षीरसागर

या मोहिमेमुळे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांना आळा घालण्यास मदत होणार असून, शहर स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी नागरिकांचेही सहकार्य मोलाचे आहे, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

बीड (प्रतिनिधी)दि.२६ : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आरोग्य व स्वच्छतेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची भेट घेऊन शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम गतीने राबवण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने सोमवारपासून (दि.२६) शहरात स्वच्छता मोहीम गतिमान केली आहे. शहरातील गटारी, रस्त्यांची सफाई, कचऱ्याची विल्हेवाट, पाण्याचे साचलेले ठिकाणे, डासनिर्मूलन अशा विविध बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहिमेच्या पहिल्याच दिवशी डॉ.योगेश क्षीरसागर स्वतः मोहिमेच्या ठिकाणी उपस्थित राहिले. त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधत स्वच्छता कामकाजाची माहिती घेतली व यंत्रणेकडून नियोजनबद्ध पद्धतीने काम करून घेतले. यावेळी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विविध भागातील माजी नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वीज पडून मृत्यू, भिंती कोसळल्या,

महाराष्ट्रात मान्सूनचं आगमन झालं आहे. पुणे, मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील उर्वरित भागातही पाऊस बरसत आहे. मुंबईत तर मान्सूनच्या पहिल्याच पावसात अनेक ठिकाणी रेल्वेरुळ पाण्याखाली गेले आहेत. काही ठिकाणी इमारती कोसळण्याच्या तर काही ठिकाणी झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. मान्सूनच्या पहिल्याच पावसात काही ठिकाणी जीवितहानीदेखील झाली आहे. विशेष म्हणजे आगामी चार ते पाच दिवसांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. मान्सूनच्या पहिल्याच पावसात विरारमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. येथे स्लॅबचे प्लास्टर डोक्यावर पडल्याने 30 वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. विरारच्या गोपचरपाडा परिसरातील पूजा अपारमेंट मधील रूम नंबर 335 मध्ये आज दुपारी 3 वाजता ही दुर्दैवी घटना घडली आहे. लक्ष्मी राजू सिंग असे मयत झालेल्या महिलेचे नाव असून ती आपल्या दोन मुलांसह घरात झोपली असता ही दुर्घटना घडली. याघटनेत दोन्ही मुले सुदैवाने थोडक्यात बचावली आहेत. घटनेची माहिती मिळताच वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळावर पोहचून मयत महिलेसह तिच्या मुलांना बाहेर काढले आहे. ज्या इमारतीत ही घटना घडली ती इमारत 30 वर्षे जुनी होती. त्यामुळे वसई विरारमधील जर्जर आणि अतिधोकायड इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मलबार हिलमध्ये संरक्षण भिंत कोसळली दुसरीकडे मलबार हिल येथे संरक्षण भिंतीचा भाग कोसळल्याची घटना घडली. ही घटना घडल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांकडून या भागाची पाहणी करण्यात आली.

# अपघातातून बचावले पण भरधाव ट्रकने चिरडले, बीडमध्ये ६ जणांचा मृत्यू,गाडी चक्काचूर

बीडच्या गढी परिसरात सोमवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आहे. आणि गाडी अक्षकसः चक्काचूर झाली आहे. घडलेल्या भीषण अपघातात गेवराई येथील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बीड येथील गढी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकाजवळ घडली. गेवराई शहरातील काही नागरिकांची चारचाकी गाडी गढी परिसरात तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली होती. त्यामुळे हे सहा जण गाडी आणण्यासाठी त्या ठिकाणी गेले होते. तेव्हा भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने थेट त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या धडकेत सर्व सहाजणांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले असून, अपघातग्रस्त कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई येथील रहिवाशाची एसयूव्ही कार राष्ट्रीय महामार्ग 52 वर 100 किमी अंतरावर असलेल्या गढी गावाजवळ दुभाजकावरुन चढली.

# अंजनवती हायस्कूल अंजनवती येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न.

बीड (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था संचलित अंजनवती हायस्कूल अंजनवती या शाळेमध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा 2025 उत्तीर्ण सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व एक पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.




शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक श्री शिरीष घरत व सर्व कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व अभिनंदन केले. या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शाळेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी वृंद व पालक उपस्थित होते.

## तुळजापूर -औसा महामार्गावर कारचा भीषण अपघात झाल्याची घटना

# या अपघातात भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू

तुळजापूर -औसा महामार्गावर कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे, या अपघातात भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला आहे, आर. टी. देशमुख हे माजलगावचे माजी आमदार होते.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, तुळजापूर-औसा महामार्गावर कारचा भीषण अपघात झाला आहे, या अपघातामध्ये भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचं निधन झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आर. टी. देशमुख हे माजलगावचे माजी आमदार होते.

समोर आलेल्या माहितीनुसार महामार्गावरील बेलकुंड उड्डाण पुलावरून जात असताना त्यांची कार रस्त्यात साचलेल्या पाण्यामुळे स्लिप झाली, कार स्लिप झाल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला. कार सुरक्षा कठडा तोडून चार वेळेस पलटी झाली, या अपघातामध्ये आर.टी. देशमुख हे गंभीर जखमी झाले हेते, त्यांना लातूर येथील रुग्णालयात उपचारासाठी नेत असतानाच वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. कार स्लिप झाल्यानं अपघात दरम्यान मिळत असलेल्या माहितीनुसार तुळजापूर-औसा महामार्गावर हा अपघात झाला आहे. पावसाच्या पाण्यामुळे बेलकुंड उड्डाण पुलावर कार स्लिप झाली, अनियंत्रीत झालेली कार सुरक्षा कठडा तोडून चारवेळेस पलटी झाली, या भीषण अपघातामध्ये देशमुख गंभीर जखमी



झाले हेते, त्यांना उपचारासाठी लातूरला नेत असताना वाटेच त्यांचा मृत्यू झला आहे. आर. टी. देशमुख यांच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कोण होते आर. टी. देशमुख? आर. टी. देशमुख हे भाजपचे माजी आमदार आहेत. ते 13 व्या विधानसभेत माजलगाव विधानसभा मतदारसंघातून प्रचंड बहुमतानं विजयी झाले होते. त्यांच्या राजकारणावर गोपीनाथ मुंडे यांचा प्रभाव होता, भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते अशी त्यांची ओळख होती, त्यांनी पक्षांतर्गत अनेक महत्त्वाच्या पदावर काम केलं. मनमिळावू , प्रेमळ आणि सर्वांना सहकार्य करणारा असा त्यांचा स्वभाव होता, त्यांच्या निधनानं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## संपादकीय

# आगीच्या घटना अत्यंत चिंताजनक

देशात दिवसेंदिवस आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.यात काही नैसर्गिक तर काही मानवी चुकांमुळे आगीच्या घटना घडतांना दिसतात.तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली.या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला ही भयावह घटना अंगावर शहारे येणारी आहे.ही घटना शॉटसर्कीटमुळे झाल्याचे सांगितले जाते.ही आग चारमिनार या गजबजलेल्या परिसरातील एका इमारतीतील तळघरात अचानक आग लागली आणि बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले व आगीचे लोण वरच्या मजल्यावर पसरले आणि आगीने विक्राळ रूप धारण करू १७ लोकांचा बळी घेतला व अनेक जण जखमी झाले.याच दिवशी सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल कारखान्याला रविवार १८ मे रोजी पहाटे ३.३० ते ४ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली व क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि अग्नितांडव सुरू झाले. यात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले.या दोन्ही घटनांमध्ये २५ नागरिकांचा मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.परंतु आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.परंतु चारमिनार परिसरातील आग असो अथवा सोलापुरातील टॉवेल कारखान्याला लागलेली भीषण आग असो या दोन्ही आगीच्या घटना मानवी चुकांमुळे झाल्याचे दिसून येते.कारण शॉटसर्कीट का होते याचे मुख्य कारण म्हणजे इलेक्ट्रिक विभागाकडून ऑडिट न करने किंवा इलेक्ट्रिकची तपासणी न करता त्याकडे दुर्लक्ष केल्याने शॉटसर्कीटचे प्रकार राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे.म्हणजेच इलेक्ट्रिकच्या बाबतीत टेक्नीकल फॉल्टकडे दुर्लक्ष केल्याने अशा भयावह घटना नेहमीच घडत असतात व यामुळे जीवीत हाणी मोठ्या होत आहे.वाढती लोकसंख्या, शहरीकरण,औद्योगिकीकरण, गगनचुंबी इमारती,वातानुकूलित संयंत्र याठिकाणी आगीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.बदलते हवामान,वाढती लोकसंख्या,शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे होणाऱ्या आगीच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने या घटनांकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे. कारण एक आगीची घटना करोडोंची वित्तीय हानी तर होतेच सोबतच मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुध्दा होतांना आपण पहातो ही जीवीत हानी कदापि भरून काढता येत नाही.याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने अग्निशमन विभागाला सशक्त करून अत्याधुनिक यंत्र सामग्री ताबडतोब अग्निशमन विभागाला पुरविने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येते त्याचीही पुर्तता सरकारने युध्दपातळीवर करने अत्यंत गरजेचे आहे. कारण मनुष्यबळा शिवाय कोणतेही काम शक्य नाही.त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार अत्याधुनिक यंत्रसामग्रीची नितांत गरज आहे आणि आगीच्या वाढत्या घटना पहाता औद्योगिक परिसरात आणि गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन व्यवस्था सक्तीची करायला हवी.कारण राज्यात किंवा देशात छोट्या-मोठ्या आगीच्या घटना दररोज कुठे ना कुठे होतांना आपण पहातो आणि यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जीवीत हाणी होत आहे ही अत्यंत गंभीर व संवेदनशील बाब आहे यावर राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व आगीच्या घटना टाळण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करण्याची नितांत गरज आहे

## टीसी हरवला आहे

शाळा सोडल्याचा दाखला हरवला आहे
शितल रामेश्वर उबाळे हिचा शाळा सोडल्याचा दाखला दिनांक 22 मे 2025 रोजी बीड ते चऱ्हाटा प्रवासादरम्यान हरवला आहे कोणाला सापडल्यास संपर्क साधावा. 9637881422

# "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रि शताब्दी जन्मोत्सव निमित्त विविध स्पर्धांचा निकाल जाहीर."






निगडी:पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित दरवर्षीप्रमाणे सरस्वती माध्यमिक विद्यालय आकुर्डी,पुणे ३५ येथील शिक्षिका,लेखिका,कवयित्री,निवेदिका,संपादिका,समीक्षक प्रतिमा काळे/खेमनर यांनी ऑनलाईन स्वरूपात एकूण पाच स्पर्धा घेतल्या. त्यात वक्तृत्व,रांगोळी,चित्रकला,लेख लेखन,काव्य लेखन स्पर्धा.काव्य लेखन व लेख लेखन स्पर्धेस छान प्रतिसाद लाभला. प्रत्येक स्पर्धेचे परीक्षक ठरवलेले होते.१) वक्तृत्व स्पर्धा :प्रमोद सूर्यवंशी,मुंबई.२) रांगोळी स्पर्धा: सौ.सारिका अस्मार,पुणे.३) चित्रकला स्पर्धा:अक्षदा तावरे,पुणे.४)लेख लेखन स्पर्धा:सौ.राजश्री मराठे,पुणे.५) काव्य लेखन स्पर्श परीक्षण आनंद घायवट,कसारा यांनी केले.सर्वांनी वेळेत अचूक परीक्षण केले.सर्व स्पर्धकांना आयोजक.प्रतिमा काळे यांनी डिजिटल सन्मानपत्र व्हाट्स अप व फेसबुक वर दिले.तसेच सर्वांना११जून२०२५ रोजी पिंपरी चिंचवड,पुणे येथे ऑफलाईन स्वरूपात कवी संमेलन,पुस्तक प्रकाशन व बक्षीस वितरण समारंभ ठेवला.स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे व सहभागी सर्व स्पर्धकांचे आयोजक प्रतिमा काळे यांनी अभिनंदन केले.विशेष बाब म्हणजे संजीवनी शिवाजी जगताप यांनी पाचही स्पर्धात सहभाग घेतला त्यांचे विशेष कौतुक.सर्वांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य पोहचावे हा उद्देश सफल झाला. लेख,कविता वाचनीय,अभ्यासपूर्ण होते,तसेच रांगोळी अन् चित्र ही सुंदर रेखाटले होते.वक्तृत्व स्पर्धेत तीनच सहभाग नोंदविले पण तिघांचे ही वक्तृत्व अप्रतिम होते.या सर्व स्पर्धांचा निकाल खालीलप्रमाणे आहे.१)वक्तृत्व/व्हिडिओ सादरीकरण स्पर्धा निकाल:गट क्रमांक१:इ.१ ली ते री:१)प्रिशा स्नेहा विराज तांबे,पुणे:प्रथम क्रमांक,गट क्रमांक २: इ.३री ते ५ वी:सहभाग नाही,गट क्रमांक ३:इ.६ वी ते ८वी:सहभाग नाही,गट क्रमांक ४: इ.९ वी ते१२ वी:सहभाग नाही,गट क्रमांक ५,खुला गट:१)पल्लवी कदम,मुलुंड प:प्रथम क्रमांक,२)श्रीमती संजीवनी शिवाजी जगताप,पुणे: द्वितीय क्रमांक.२)रांगोळी स्पर्धा निकाल:गट १:१ ली ते २री:१)आयुष अविनाश तांबे,२ री,पुणे;प्रथम क्रमांक,२)प्रीशा स्नेहा विराज तांबे,पुणे:द्वितीय क्रमांक,गट २:३ री ते ५ वी:सहभाग नाही.गट ३:६ वी ते ८ वी:१)माहेश्वरी बापूराव बाजगिरे,८ वी,पुणे:प्रथम क्रमांक,२)कु.जान्हवी बापूराव बाजगिरे,६ वी,पुणे :द्वितीय क्रमांक.३)कु.गौतमी भानुदास कांबळे,७ वी,पुणे:तृतीय क्रमांक,गट ४:९ वी ते १२ वी:सहभाग नाही,गट ५: खुला गट:१) सौ.हर्षा उध्दव भुरे,भंडारा:प्रथम क्रमांक,२) श्रीमती संजीवनी शिवाजी जगताप,पुणे: द्वितीय क्रमांक.३)चित्रकला स्पर्धा निकाल:गट १:१ ली ते२री:१)गायत्री गणेश काळे,१ ली,प्रथम क्रमांक,२)आयुष अविनाश तांबे,२री,पुणे,द्वितीय क्रमांक, ३)सक्षम संदीप आखाडे,१ ली,तृतीय क्रमांक,गट २:३ री ते ५ वी:१)आस्मी मुकुंद पेटकर,५ वी,प्रथम क्रमांक,२)आरव उदावंत,३ री,नाशिक,द्वितीय क्रमांक,गट ३:६ वी ते ८ वी:सर्वोत्कृष्ट:वेदश्री पुनम विनायक जाधव,७ वी,उत्कृष्ट:महेश्वरी बापूराव बाजगिरे,पुणे,प्रथम:जान्हवी बापूराव बाजगिरे,६ वी,पुणे,द्वितीय:मीरा मंगेश मगर,६ वी,पुणे,तृतीय:मृण्मयी गणेश काळे,६ वी,लोणावळा,पुणे,उत्तेजनार्थ:१) राजरत्न भानुदास कांबळे,६ड वी,पुणे,२) गौतमी भानुदास कांबळे,७ वी,पुणे,३)श्रावणी वाल्मिक जावळीकर,पुणे,सहभाग नावे:१) धनश्री विष्णु पाचारे,६ वी,पुणे,२)राधिका रामेश्वर जाधव,६ वी,जालना,३)सेजल हनुमंता नरसन्ना,७ वी,मुंबई,गट ४:९ वी ते १२ वी:प्रथम:गार्गी संतोष तितर,१२ वी,पुणे,द्वितीय:दिव्यांका संगम बगाडे,९ वी,पुणे,तृतीय: स्नेहल सागर मडके,१२ वी,सातारा,उत्तेजनार्थ:१)जगदीश हनुमंता नरसन्ना,वर्ग १२वी,मुंबई ५१,गट५ :खुला गट:प्रथम:संगीता संजय रोंघे,छ.संभाजीनगर द्वितीय:श्रीमती संजीवनी शिवाजी जगताप,पुणे,तृतीय:सौ.राधिका बापट,ठाणे.४)लेख लेखन स्पर्धेचा निकाल:गट१:१ली ते २री,१) संजीवनी शशिकांत बंडगर,२ री,प्रथम क्रमांक,२)इनायानूर रशीद अन्सारी,१ ली,इंदापूर:द्वितीय क्रमांक,गट२:३ री ते५ वी: सहभाग नाही,गट३:६ वी ते ८ वी:१) दर्शन अभिनंदन देबाजे,कोल्हापूर:प्रथम क्रमांक,गट ४:९ वी ते १२ वी:प्रथम क्रमांक:कुमारी दिव्या ज्ञानेश्वर पाटील,९ वी,हुंमगाव,द्वितीय क्रमांक: वैष्णवी सुनिल कोठूरकर,९ वी,नाशिक,गट क्रमांक५/खुला गट:सर्वोत्कृष्ट:श्री.संतोष गोकुळदास जगताप,अहिल्यानगर,उत्कृष्ट:श्रीमती कोकिळा ज्ञानदेव ढाके,पुणे,प्रथम:सौ. वैशाली चांदेकर,ठाणे,द्वितीय:श्री.किशोर जी. खराते,पुणे,तृतीय:सौ.अलका ज्ञानोबा सपकाळ,धाराशिव,उत्तेजनार्थ:१) श्री.विकास गोपाळ खराते,लातूर,२) डॉ. शैलजा शंकरराव कोरडे,नवी मुंबई,३)सौ.अनुराधा गो.जोशी,मुंबई लेख लेखन स्पर्धा सहभाग यादी:१) सौ.श्रद्धा सुहास शिंदगीकर,पुणे,२)देवयानी शशिकांत म्हंकाळे,अहिल्यानगर,३)श्री. अशोक भगवंत वाघमारे,पुणे,४)मानसी विजय चिटणीस,पुणे,५)प्रा.रेखा रमेश फाले,पुणे,६)मिलिंद मुकुंद कल्याणकर,नवी मुंबई,७) वर्धा विलास हरमलकर,गोवा,८) सौ.सोनाली अमोल कांबळे,धाराशिव,९) कु. कश्मिरा उल्हास गुप्ते,मुंबई,१०) जयवर्धन अभिनंदन देबाजे,कोल्हापूर,११) सौ.शलाका ओक/परांजपे,ठाणे,१२) गौरी संतोष जंगम,सांगली,१३) भारत कवितके,मुंबई,१४) सौ. वर्षा अमोल गावंडे,बुलढाणा,१५) गुरुदत्त दिनकर वाकदेकर,मुंबई,१६) अनुराधा कल्याणी,पुणे,१७)श्रीमती संजीवनी शिवाजी जगताप,पुणे,१८) सौ.जयश्री विष्णू मारकड,इंदापूर,१९) हर्षदा कामत,ठाणे,मुंबई,२०) प्रा.अनिता सुळे,चिंचवड,पुणे,२१)शितल हनुमंता नरसन्ना,मुंबई उपनगर,२२)सौ.अंजली राजेंद्र कस्तुरे,संभाजीनगर,२३) नितीन पासलकर,दौंड,२४) सौ.मंगला सुधाकर कुमावत,२५) अश्विनी श्रीनिवास चेन्नूर,पुणे,२६)सुप्रिया सुहास धुरी,मुंबई,२७)मिता साटम, २८)विशाखा हेमचंद्र चितळे,रत्नागिरी,२९) नितीन पासलकर,पुणे,३०)कुमारी योगिता नरसिंग सूर्यवंशी,मुंबई अंधेरी,३१) माधवी भूत (माधूराज),नागपूर,३२)रवींद्र महिपती शिंदे,पुणे.५)काव्य लेखन स्पर्धेचा निकाल:गट १:इ.१ली ते२ री:सहभाग नाही,गट २:३री ते ५ वी:सहभाग नाही,गट ३: इ.६ वी ते ८वी:प्रथम क्रमांक:दर्शन अभिनंदन देबाजे,७ वी,कोल्हापूर,द्वितीय क्रमांक:अक्षदा प्रदीप शिरढोणे,७ वी,पुणे,तृतीय क्रमांक:गायत्री धनंजय टिळेकर,७ वी,उरळी कांचन,पुणे,गट ४:इ.९ वी ते १२ वी:प्रथम क्रमांक:कु. स्नेहा मीरा संतोष खोडके,छ.संभाजी नगर,द्वितीय क्रमांक:वैष्णवी सुनिल कोठूरकर,नाशिक,तृतीय क्रमांक:कु. अनुष्का उदय पाटील,१० वी,सातारा,गट क्रमांक५,खुला गट:सर्वोत्कृष्ट:अमर दादाराव जंजाळ,उत्कृष्ट:गुरूदत्त वाकदेकर,प्रथम:राधिका बापट,द्वितीय:सुरेश शेठ,तृतीय:चेन्नूर अश्विनी श्रीनिवास,उत्तेजनार्थ:१) कु.वैशाली लांडगे,२)सौ.सावित्री कांबळे,३)किशोर जी.खराते.सहभाग यादी,खुला गट:१) सौ.स्मिता सुनील कुलकर्णी,पुणे,२) सौरभ विकास वाणी,भुसावळ,३)प्रमोद न.सुर्यवंशी,मुंबई,४)महादेव लांडगे,बीड,५) धनंजय लीलाधर इंगळे,चिंचवड,पुणे,६) सौ.सरोज सुरेश गाजरे,ठाणे,७)श्रीमती देवयानी शशिकांत म्हंकाळे,अहिल्यानगर,८) सौ.कल्पना शैलेश तांबट,बुलढाणा,९) वैशाली वर्तक,अहमदाबाद,१०)श्री.अशोक भगवंत वाघमारे,पुणे,

# हरित क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.नांदेड शहरातील कै.वसंतराव नाईक चौक येथे पार पडलेल्या या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा



मुंडे, महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुसिंग महाराज राठोड, आमदार बाबुराव कदम, आमदार श्रीजया चव्हाण,आमदार भीमराव केराम जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते. प्रारंभी मंचावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर श्री. शाह यांनी कळ दाबुन पुतळ्याचे अनावरण केले. तसेच त्यांच्या हस्ते नामफलकाचेही अनावरण करण्यात आले. याप्रसंगी बंजारा समाजाच्यावतीने श्री. शाह व श्री. फडणवीस यांचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नागरिक उपस्थित होते. हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक परिसरात उभारला आहे. नऊ फूट उंचीच्या या पुतळ्याचे वजन सुमारे 700 किलो आहे. पुतळ्याच्या उभारणीसाठी रुपये 13 लक्ष 99 हजार एवढा खर्च आला आहे. 232.60 चौ.मी. जागेत या पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सुशोभिकरणाचे अंदाजे 69 लाख रुपयांची कामे आहेत.कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरण: सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, मपुराणातील उल्लेख ऐतिहासिक पुरावे

मथुरामध्ये श्रीकृष्ण जन्मभूमी आणि शाही ईदगाह मशिद प्रकरणावर अलाहाबाद कोर्टात शुक्रवारी सुनावणी पूर्ण झाली आहे. न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांच्या खंडपीठाने हिंदू पक्षकारांच्या 18 याचिकांवर विचार करण्यात येईल, असं निरीक्षण नोंदवले आहे. हिंदू पक्षकारांच्या दाव्यानुसार ईदगाह मशिदीची 2.37 एकर जमीन भगवान श्रीकृष्ण यांचे जन्मस्थान म्हणजेच गर्भगृह आहे. त्यांनी मशिद वादग्रस्त असल्याचे आणि जमीन मंदिर ट्रस्टला सोपवण्याची मागणी हिंदू पक्षकारांनी केली आहे. तर, दुसरीकडे मुस्लिम पक्षकारांनी दावा केला आहे की, मशिद एक अधिकृत धार्मिक स्थळ आहे. कोर्टाने सुनावणीदरम्यान काही याचिकांवर दाखल केलेल्या अर्जांचा विचार केला असून संबंधित पक्षकारांकडून उत्तर मागितले आहे. त्याचबरोबर कोर्टाने या प्रकरणासाठी पुढील तारीख दिली आहे. आता या प्रकरणात 4 जुलै रोजी सुनावणी होणार आहे. आत्ता झालेल्या सुनावणीत अलाहाबाद उच्च न्यायालयाने सुनावणीत महत्त्वपूर्ण निर्णय देताना म्हटलं आहे की, पुराणातील कथांवर आधारित उल्लेख हे ऐतिहासिक पुरावे म्हणून पूर्णपणे स्वीकारले जाऊ शकत नाहीत आणि ते केवळ संदर्भ म्हणून विचारात घेतले जाऊ शकतात. यासोबतच, श्री राधारानींना या खटल्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची याचिकाकर्त्यांची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायमूर्तींच्या खंडपीठाने युक्तिवाद ऐकताना सांगितले की, पुराणातील उल्लेखांना कायदेशीर पुराव्यांचे स्वरूप देणे कठीण आहे. याचिकाकर्त्यांनी राधारानींना पक्षकार बनवण्याची मागणी केली होती, कारण त्यांचा श्रीकृष्ण जन्मभूमीशी धार्मिक आणि सांस्कृतिक संबंध आहे. मात्र, न्यायालयाने ही मागणी नामंजूर केली.अखेर प्रकरण काय?

हा वाद मथुरेतील 13.37 एकर जमीनीशी संबंधित आहे. ज्यात 11 एकर जमीनीवर श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिर आणि 2.37 एकरावर शाही ईदगाह मशिद आहे. हिंदू पक्षकारांच्या दावा आहे की, येथील प्राचीन मंदिर तोडून मशिद बांधण्यात आली आहे. तर मुस्लिम पक्षकारांचे म्हणणे आहे की, याबाबत काही ठोस पुरावे नाहीयेत.

अलहाबाद उच्च न्यायालय हे प्रकरण अयोध्या निकालाच्या आधारे पाहण्यात येत आहे. सर्व 18 याचिकांवर एकत्र सुनावणी होणार आहे. या प्रकरणी दोन्ही पक्षकारांकडून याचिका दाखल केल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयात या संबंधित याचिकेवर सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णय योग्य ठरवत हिंदू पक्षकारांच्या याचिकेत संशोधन आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाला पक्षकार करण्याची परवानगी दिली आहे.






# फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांना पत्नीने लगावली कानाखाली? विमानातील विडिओ व्हायरल, पायऱ्या उतरताना दुर्लक्ष

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष अध्यक्ष मॅक्रॉन यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत पत्नी त्यांच्या चेहऱ्यावर चापट लगावताना दिसत आहे. जणू काही भांडणानंतर पत्नी रागाने चेहरा ओरबाडत आहे. इम्यॅन्युएल मॅक्रॉन आग्नेय आशियाच्या दौऱ्यावर असून यानिमित्ताने ते व्हिएतनाममध्ये दाखल झाले होते. विमान लँड झाल्यानंतर दरवाजा उघडण्यात आला असताा, पत्नीने त्यांच्या चेहऱ्यावर चापट मारल्याप्रमाणे हावभाव केल्याचं कैद झालं. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हिडीओत फुटेजमध्ये राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन बोर्डिंग गेटच्या शेजारी असलेल्या प्रवेशद्वारात उभे असताना, त्यांच्या पत्नी ब्रिजिटशी बोलत असल्याचं दिसत होतं. सुरक्षा अधिकाऱ्यांनी गेट उघडले तेव्हा ब्रिजिट अजूनही केबिनमध्येच होत्या. तर मॅक्रॉन दरवाजात उभे दिसत होते. यावेळी अचानक पत्नीचा हात बाहेर येतो आणि आक्रमक हावभाव करत त्यांचा चेहरा बाजूला करतो. विमानात पाऊल ठेवणाऱ्या एका क्रू मेंबरने हे पाहिले आणि तो लगेच मागे हटला. या प्रकाराने मॅक्रॉन काहीसे रागावलेले, घाबरलेले दिसत होते. पण बोर्डिंग गेट



उघडा असल्याचं लक्षात येताच आणि कॅमेरा आपल्याला टिपत असल्याचं लक्षात येताच त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव बदलतात.ते हसतात आणि कॅमेराकडे इशारा करण्यासाठी त्यांचा उजवा हात वर करतात. त्यांचा दुसरा हात गेटवेच्या बाजूला असलेल्या हँडलला धरून असतो. यानंतर व्हिडिओमध्ये दोघेही विमानातून खाली उतरताना दिसत आहे. मॅक्रॉन यावेळी पायऱ्यांवरुन उतरण्याआधी पत्नीकडे हात करतात. पण रागात असलेल्या ब्रिजिटशी हाताकडे दुर्लक्ष करत चालत सुटतात. याऐवजी त्या रेलिंगला पकडतात आणि खाली उतरतात. सोशल मीडियावर ही क्लिप व्हायरल होताच, सुरुवातीला मॅक्रॉन यांनी ती फेटाळून लावली आणि व्हिडिओची सत्यता नाकारली. पण तो खरा असल्याचं सिद्ध झाले. हनोईमध्ये पत्रकारांशी बोलताना या घटनेबद्दल विचारलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन म्हणाले, "आम्ही फक्त विनोद करत होतो, जसे आपण अनेकदा करतो". फ्रेंच राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयाने ही घटना तितकी गंभीर नसल्याचं म्हटलं आहे. तसंच एका जवळच्या सहकाऱ्याने वृत्तसंस्थेशी बोलताना "जोडप्यातील निरुपद्रवी भांडण" असं वर्णन केलं.

## डोळ्यात अश्रू, हातात रिकामी भांडी घेऊन भटकणारी मुले गाझाचं भयाण वास्तव

डोळ्यात अश्रू, हातात रिकामी भांडी घेऊन भटकणारी मुले... हे चित्र गाझातलं आहे. चित्रं खोटं बोलत नाहीत. आणि गाझाच्या जबलियाच्या या चित्रातील किंचाळणे ना तोंडातून बाहेर निघत आहे ना शब्दात बांधले जात आहे, फक्त डोळ्यांतून आश्रू ओसंडून वाहत आहे. धुळीने माखलेले चेहरे, घामाने भिजलेले कपाळ आणि थरथरत्या हातांनी धरलेली भांडी. कुणी स्टीलची प्लेट, कुणी तुटलेली बादली, कुणी प्लॅस्टिकची वाटी, सगळ्यांचा एकच हेतू ते म्हणजे मिळेल ते खाणं. इस्त्रायलने अलीकडेच गाझावरील संपूर्ण निर्बंध शिथिल केले आहे. असं असलं तरी आतापर्यंत केवळ 300 ट्रक अन्न पोहोचू शकले आहेत. हे चित्र गाझामधील वाढत्या मानवतावादी शोकांतिकेचा जिवंत पुरावा आहे. इथले लोक उपासमारीने मरत आहे. गाझा सिव्हिल डिफेन्सचे प्रवक्ते महमूद बसाल म्हणतात, "हे मृत्यूचे 'स्लो पॉइझन' आहे. चित्रात दिसणारी मुलं लहान असली तरी चेहऱ्यावर भुकेचा असा अनुभव आहे जो कदाचित त्यांना आयुष्यभर सोडणार नाही. एक वाटी डाळीसाठी तासंतास रांगेत उभे राहतात, तरीही अनेकदा रिकाम्या हाताने परतावे लागते. आई आपल्या बाळांना हातात घेऊन भांडी धरत आहेत, त्यांच्यापैकी बऱ्याच



जणांना त्यांनी शेवटचे कधी खाल्ले हे देखील माहित नाही. केवळ 300 ट्रक अन्न पोहोचू शकले इस्त्रायलने अलीकडेच गाझावरील संपूर्ण निर्बंध शिथिल केले असले तरी महमूद बासल म्हणतात की "बहुतेक लोकांना अद्याप पिठाची पिशवी मिळालेली नाही." आतापर्यंत केवळ 300 ट्रक अन्न पोहोचू शकले आहेत. गंभीर कुपोषणामुळे गाझामधील नवजात अर्भक आणि अकाली बाळांची अवस्था सर्वात वाईट आहे. त्यांना दूध मिळत नाही, आवश्यक पोषक तत्वेही मिळत नाहीत. जबलियासारख्या भागात कम्युनिटी किचन ही लोकांची शेवटची आशा बनली आहे. पण त्यांच्याकडे पुरेसे रेशन किंवा संसाधने नाहीत. काही स्वयंसेवक किमान जीव वाचवण्यासाठी उकडलेली डाळ, पोळी अशा साध्या गोष्टी कसेबसे शिजवत आहेत. जग ऐकतंय का?

भारतासह अनेक देश मानवतावादी मदत पाठवण्याच्या गप्पा मारत आहेत, पण वास्तव हे आहे की, जोपर्यंत भक्कम आणि सुरक्षित मदत व्यवस्था अस्तित्वात येत नाही, तोपर्यंत या चेहऱ्यावर सुटकेची आशा नाही. गाझाचा हा फोटो एकदाही पाहिला तर

## पाकिस्तान सोबत मैत्रीच्या नादात तुर्कीकडून मोठी चूक, तालिबान खवळणार



पाकिस्तान सोबत मैत्रीच्या नादात तुर्कीने मोठी चूक केली आहे. इंस्ताबुलच्या बैठकीत तुर्कीने तालिबानला इस्लामच्या मुद्यावरुन भरपूर सुनावलं. तुर्कीच्या या कृतीमुळे तालिबान नाराज होऊ शकतो. असं झाल्यास त्याचा थेट फटका पाकिस्तानला बसेल. इंस्ताबुल येथील एका बैठकीत तुर्कीने म्हटलं की, "अफगाणिस्तानात दहशतवादी पाळले जात आहेत. हे बरोबर नाही" खासबाब म्हणजे तुर्कीने हाच आरोप पाकिस्तानवर केला नाही. तुर्कीने अफगाणिस्तानकडे हा दहशतवाद तात्काळ संपवण्याची मागणी केली.अफगाणिस्तानने हिंसाचाराचा मार्ग सोडून असं सरकार बनवलं पाहिजे, जे लोकशाहीला धरुन असेल, असं तुर्कीने म्हटलं. महिलांवर होणाऱ्या अत्याचारावरुनही तुर्कीने तालिबानची निंदा केली. इंस्ताबुलने तालिबान विरुद्ध अशावेळी टिप्पणी केली आहे, जेव्हा पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ अंकारा दौऱ्यावर आहेत. आता यावर तालिबानकडून काय प्रतिक्रिया येते, याची प्रतिक्षा आहे. पाकिस्तानचा पुढचा मार्ग खडतर अफगाणिस्तानात तालिबानची राजवट आहे. तालिबान कट्टरपंथीय शासक म्हणून ओळखले जातात.

## साक्षात डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने महाघोटाळा, अनेकांचे लाखो रुपये गडप,

जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने महाघोटाळा झाला आहे. या घोटाळ्यात २०० हून अधिक भारतीयांना चांगलाच चुना लागला आहे. या सायबर फ्रॉडमध्ये भले भले लोक अडकले आहेत. यामुळे ट्रम्प याच्या रियल इस्टेट बिझनेसच्या नावाने लोकांना उल्लू बनविण्यात आले. आणि लोकांनीही साक्षात ट्रम्प सांगत आहेत म्हणून डोळे आणि मेंदू दोन्ही झाकून आपल्या आयुष्याची जमापुंजी या स्कीममध्ये गुंतवली आणि आता पैसे गडप झाल्याने हे लोक मेटाकुटीला आले आहेत.

## आम्ही युद्धासारख्या परिस्थितीत: बांगलादेशातील निवडणुका मोहम्मद युनूस यांनी पुन्हा टाळल्या

बांगलादेशमधील परिस्थिती कठीण झाली आहे. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकारच्या धोरणांविरोधात आंदोलन सुरु आहे. नागरिक आणि व्यापाऱ्यांकडून अनेक शहरांमध्ये आंदोलन केले जात आहे. ढाका शहरात भयग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. कधीही काहीही होऊ शकते, अशी भीती लोकांना आहे. शिक्षकांनी आजपासून काम बंद आंदोलन पुकारले आहे. दरम्यान, परिस्थिती खराब असल्याचे कारण देत पुन्हा एकदा मोहम्मद युनूस यांनी निवडणुका टाळल्या आहेत. त्यांनी



आपला कार्यकाळ एक वर्ष वाढवून घेतला आहे.बांगलादेशचे अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी निवडणुका पुन्हा सहा महिने पुढे ढकलल्या आहेत. आतापर्यंत डिसेंबर २०२५ पर्यंत निवडणुका घेण्यात येणार असल्याचे ते सांगत होते. परंतु आता पुढील वर्षी जून महिन्यापर्यंत निवडणुका घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ते ३० जूनपर्यंत पदावर कायम राहणार आहे. देशात युद्धासारखी परिस्थिती आहे, असे सांगत युनूस यांनी निवडणुका टाळल्या आहेत. दुसरीकडे बांगलादेशातील राजकीय पक्ष आणि विविध संघटनांनी डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्याची मागणी रेटून धरली आहे. त्यासाठी बांगलादेशात उग्र आंदोलन सुरु आहे.

व्यापारी संघटना काय म्हणते...

व्यापारी संघटनेचे प्रमुख शौकत अजीज रसेल यांनी म्हटले की, युनूस सरकारने व्यापाऱ्यांवर १९७१ मधील परिस्थिती पुन्हा आणली आहे. त्या काळात मुक्ती संग्राममधील बुद्धिजीवी लोकांनी व्यापाऱ्यांवर कठीण परिस्थिती आणली होती. सध्या दुष्काळसारखी परिस्थिती निर्माण होत आहे. बेरोजगारी वाढत आहे. बांगलादेश टेक्सटाइल्स मिल्स असोसिएशनचे (बीटीएमए) अध्यक्ष रसेल यांनी सांगितले की, आम्ही ईद-उल-अजहापूर्वी कामगारांना पगार आणि बोनस देऊ शकतो की नाही, हे सांगता येत नाही. सरकार गुंतवणूकदरांना आमंत्रित करत आहे. पण गुंतवणूकदारांना देशातील परिस्थिती माहिती आहे. गुंतवणूकदार बांगलादेशात येणार नाही.

# अद्भूत! भारतातील एक असं गाव, जिथून दुर्बिणीशिवाय दिसते दुसरी आकाशगंगा इथे असते सर्वात काळीकुट्ट रात्र, अन लख्ख चांदणं

हल्ली आकाशात रात्रीच्या वेळी पाहिलं, तर लुकलुकणारे तारे, चांदण्या दिसण्याचं प्रमाण तुलनेनं बरंच कमी झालं आहे. यामागे कैक कारणं असून त्यातची बरीच कारणं सर्वज्ञाच आहेत. मात्र जिथं प्रदूषणाची पातळी वाढत आहे तिथंच भारतात निसर्गाचा एक कमाल आविष्कार येणाऱ्या प्रत्येकालाच हैराण करून सोडत आहे. हा आविष्कार कुठंय माहितीये?हा आविष्कार म्हणजे भारतातील अतिशय दुर्गम भागात असणारं एक लहानसं गाव. एक असं गाव, जिथं बाहेरचं कोणी गेलं, तर त्यांची दमछाक होते, थंडीनं दाकखिळी बसते, एक असं गाव जिथं दूरदूरपर्यंत कोणीच नसल्यामुळं रात्रीच्या वेळी इथं नुसतं बाहेर वावरणंही धडकी भरवतं. जगातील आणि भारतातील काळोख्या रात्रींसाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि



अवकाश अगदी सहजपणे दिसणाऱ्या या ठिकाणाचं, या गावाचं नाव आहे हान्ले/हानले.हानले (Hanle) हे लडाखमधील एक अतिशय लहानसं आणि दूरवर वसलेलं एक गाव. लडाखच्या पूर्व भागात, चांगथांग पठारावर हे गाव स्थित असून, लेहपासून ते साधारण 250 किमी अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे हे गाव साधारण 4,500 मीटर (14,760 फूट) उंचीवर वसलेलं असून, ते आपल्या निसर्गरम्य सौंदर्यासह खगोलशास्त्रीय महत्त्वासाठीही प्रसिद्ध आहे. मागील काही वर्षांमध्ये हानलेच्या दिशेनं येणाऱ्या पर्यटकांचा ओघ वाढला असून, या बदलाला खगोलशास्त्रीय पर्यटन असंही नाव देण्यात येत आहे.,जगातील सर्वात उंचावरील वेधशाळा हानले येथील वेधशाळा ही जगातील सर्वात उंचावरील वेधशाळांपैकी एक आहे. ही वेधशाळा आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संस्थांकडून विविध निरीक्षणपर कामांसाठी वापरली जाते. हानलेमध्ये फारच कमी वस्ती आणि कोणतेही शहरीकरण नसल्यामुळं इथं कृत्रिम प्रकाशाचा प्रचंड अभाव आहे, ज्यामुळे येथील रात्र सर्वाधिक काळ्याकुट्ट आणि काशी धडकी भरवणाऱ्या असतात. 2022 मध्ये हानले हे ठिकाण भारताचा पहिला "Dark Sky Reserve" म्हणून घोषित करण्यात आला आणि साऱ्या जगाचं लक्ष या ठिकाणानं वेधलं. खगोल अभ्यासक आणि ग्रहताऱ्यांमध्ये रमणाऱ्यांसाठी हानले म्हणजे एक परवणी.इथं रात्री फक्त 'ताऱ्यांचा' खेळ चाले....दिवस मावळतीला गेल्यानंतर आणि आकाश जेव्हाजेव्हा निरभ्र असेल तेव्हातेव्हा हानलेमध्ये रात्रीच्या अंधारात काही अद्वितीय दृश्य आणि ग्रहतारे पाहता येतात. मिल्की वे अर्थात दुसऱ्या आकाशगंगा इथून अगदी सहजपणे आणि त्यासुद्धा कोणत्याही दुर्बिणीशिवाय पाहया येतात. उल्कावर्षा, तुटणारे तारे, ताऱ्यांचा वर्षाव, चंद्र, ग्रह आणि उत्तरेकडील प्रकाशरेषा असा अद्भूत नजराणा हानले इथं येणाऱ्या प्रत्येकापुढं सादर करतं.

राहिला मुद्दा इथवर पोहोचण्याचा तर, लेहपासून इथं येण्यापर्यंतचा प्रवास तुलनेनं अधिक खडतर आहे. शिवाय चीन सीमेनजीक हा भाग येत असल्यानं अनेकदा इथं काही संवेदनशील भाग ओलांडून पोहोचावं लागतं.

प्रवास कितीही मोठा असला तरीही हानलेमध्ये येऊन जेव्हा आपल्याला नगण्य भासवणारी भव्य आकाशगंगा आभाळात दिसते तेव्हा इथं येण्याचं खरं चीज झाल्याचीच एकमेव भावना मनात घर करते. मग..... जाणार ना हानलेला?

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com